# मिरा भाईंदर महानगरपालिका
## उदयान विभाग

दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र.२८१०३४०९


दिनांक : ०१/ ०८/२०२४

जा.क्र मनपा/उदयान/मिरारोड/ २४८ /२०२४-२५

प्रति,
सिस्टम मॅनेजर,
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय — संकेत स्थळावर जाहिर नोटीस सुचना प्रसिध्द करणेबाबत.**
**(धोकादायक झाडे मुळासहित काढणेकामी)**

उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाची मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील धोकादायक झाडे मुळासहित काढणेकामी सोबत जोडलेली जाहिरात नोटीस सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

सोबत :- जाहिर नोटीस प्रत.

(कांचन गायकवाड)
सहाय्यक आयुक्त तथा
वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका
## उदयान विभाग
दुसरा मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र.२८१०३४०९


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

दिनांक : ०७ /०७/२०२४

जा.क्र. मनपा/उदयान/मिरारोड/ २४८ /२०२३-२४

// जाहीर नोटिस सुचना //

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या प्रकरण पाच कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहिर करण्यात येते की, खालील नमुद तक्त्यातील झाडे काढणे करणेकामी प्रत्यक्ष पाहणी केली असता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे आहे

| अ.क्र | वृक्षाचे नाव/ठिकाण | अंदाजे उंची | संख्या | अदांजे वय | तपशील |
|---|---|---|---|---|---|
| **१) मनपा-सातकरी तलाव / राजीव गांधी उद्यान येथिल धोकादायक झाडे मुळासहित काढणे.** | | | | | |
| १ | आकेशिया (सातकरी तलाव) | ३० ते ३५ फुट | ०१ | १५ वर्ष | सदरचे झाड सातकरी तुलसी तलाव येथिल असून तलावाच्या ट्रॅक मध्ये असून झाड एका बाजुस पुर्ण झुकलेले आहे. जोराच्या वाऱ्याने झाड पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव झाड काढणे आवश्यक आहे. |
| २ | जंगली झाड (सजीव गांधी उद्यान) | २५ ते ३० फुट | ०१ | १० वर्ष | सदरचे झाड राजीव गांधी उद्यान –पेणकरपाडा स्मशान बाजूचे उद्यान येथिल असून ट्रॅकच्या मध्ये पुर्णपणे एका बाजूस झुकलेले असून उद्यानात जेष्ठ नागरिक चालतात, लहान मुले उद्यानात खेळतात. जोराच्या वाऱ्याने झाड पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव झाड काढणे आवश्यक आहे. |
| **२) डेफोडील को.ऑ.हौ.सो.लि. यांचे दि.१०/६/२०२४ रोजीचे पत्र** | | | | | |
| १ | नारळ | ३० ते ३५ फुट | ०१ | ०८ वर्ष | सदरचे झाड डेफोडील को.ऑ.हौ.सो.लि. क्विन पार्क,मिरा भाईदर रोड मिरारोड (पु.) येथिल असून झाडाचे खोड किड लागून खराब स्थितीत दिसत आहे. तसेच झाडाच्या वरच्या बाजूस किड लागुन झाड कुजत आहे. झाडाचे मुळ जमिनीच्या वरच्या भागात आले आहे व झाड हे एका बाजूस झुकलेले आहे. सोसायटीच्या बाजुला किड्स हायस्कुल शाळा असल्याने जोराच्या वाऱ्याने झाड पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. यामुळे सदरील झाड काढणे आवश्यक आहे. |

| अ.क्र | वृक्षाचे नाव/ठिकाण | अंदाजे उंची | संख्या | अदांजे वय | तपशील |
|---|---|---|---|---|---|
| ३) नव शेरॉन अपार्टमेंट सो.लि. यांचे दि.२९/०५/२०२४ रोजीचे पत्र. | | | | | |
| १ | बदाम | २० ते २५ फुट | ०१ | ०८ वर्ष | सदरचे झाड नव शेरॉन अपार्टमेंट सो.लि.,क्विन्स पार्क, सुभाष नगर, भाईदर (पु.) येथिल मनपा रोडवरील असून नविन रस्तयाच्या मनपा रोडवरील कामामुळे झाडाची मुळे वरती आली आहे, झाडाचे खोड खालून मोडलेल्या अवस्थेत आहे.झाड रोडच्या बाजुस झुकलेले आहे. तसेच रस्त्यावर नागरिकांची वर्दळ खूप असते. जोराच्या वाऱ्याने व पावसाने झाड पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. या कारणास्तव सदरील झाड काढणे आवश्यक आहे. |

सदर प्रस्तावित वृक्ष तोडण्याची /स्थलातंरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरिकांच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहिर सुचना प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात उप-आयुक्त (उद्यान विभाग), मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे किंवा garden@mbmc.gov.in किंवा mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदतीनंतर प्राप्त होणा-या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

(कांचन गायकवाड)
सहाय्यक आयुक्त तथा
वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका